# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः03.01.2025** **वारःशुक्रवार**

---

1. पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी युनिक आयडी तयार करण्याचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय, चार हजार 849 एकर पडजमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार
2. शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याला सरकारचं प्राधान्य असल्याचं केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांचं प्रतिपादन
3. येत्या 13 ते 20 फेब्रुवारी दरम्यान रंगणार 23 वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव आणि
4. स्वप्नील कुसाळे, सचिन खिलारी यांना अर्जून पुरस्कार तर दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर, मुरलीकांत पेटकर यांचा जीवनगौरव पुरस्कारनं होणार सन्मान

**पायाभूत सुविधा प्रकल्प-युनिक आयडी**

वैयक्तिक आधार कार्डाप्रमाणेच पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठीही आधार कार्डच्या माध्यमातून युनिक आयडी तयार करण्याचा निर्णय काल झालेल्या राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले.

अनेक विभाग एकाच ठिकाणी एकाच प्रकारची विकास कामे करतात. त्यातून तीच ती कामे होऊन कोट्यवधी रुपयांचे नुकसान होते. हे टाळण्यासाठी प्रत्येक पायाभूत सुविधा प्रकल्पाला युनिक आयडी असावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी केली आहे. प्रत्येक कामाची माहिती एका सामायिक ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे संतुलित विकास साधता येईल आणि निधी, श्रमशक्ती याचा सुयोग्य वापर होईल, असं फडणवीस म्हणाले. या योजनेचं प्रारूप निश्चित करून अहवाल देण्यासाठी एक समिती तयार करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1966 च्या कलम 220 मध्ये सुधारणा करण्यासही मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. या सुधारणांमुळे शासकीय थकबाकीपोटी लिलाव होऊन सरकारजमा झालेल्या सुमारे चार हजार 849 एकर पडजमिनी शेतकऱ्यांना परत दिल्या जाणार असून मुख्यत: छोट्या आणि अल्प भूधारक शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. या बाबतचं विधेयक विधानमंडळाच्या आगामी अधिवेशनात सादर करण्यात येईल.

राज्यातली सर्व समाज विकास महामंडळं एका आयटी प्लॅटफॉर्मवर आणण्याचा निर्णयही काल घेण्यात आला. याचं प्रारूप निश्चित करण्यासाठी चार अधिकाऱ्यांची समिती स्थापन करण्यात आली आहे. 'ई ऑफिस'च्या धर्तीवर 'ई-कॅबिनेट'चे सूतोवाचही मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आलं. माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

**मंत्रालय सुरक्षा**

मंत्रालयामध्ये भेट देणाऱ्या नागरिकांची संख्या मोठी असल्यानं मंत्रालयातल्या सुरक्षा यंत्रणेवर ताण पडतो. मंत्रालयात येणारे नागरिक, अधिकारी आणि कर्मचारी यांना विनासायास, सुलभ प्रवेश मिळावा आणि सुरक्षा देखील कायम रहावी, यासाठी कृत्रिम बुद्धमतेचा उपयोग करावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल दिले. मंत्रालय सुरक्षा व्यवस्थेच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते.

**मुख्यमंत्री-मुंबई**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी विधीज्ञ उज्ज्वल निकम यांची सरकारी वकील म्हणून नियुक्ती करण्यास सरकार अनुकूल आहे. यासंदर्भात निकम यांच्याशी चर्चा झाल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल बातमीदारांशी बोलताना दिली.

**मोदी-गडचिरोली-कौतुक**

गडचिरोली जिल्ह्यातल्या दुर्गम आणि नक्षलग्रस्त भागाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासन करत असलेल्या प्रयत्नांची पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रशंसा केली आहे. औद्योगिकीकरण आणि पायाभूत सुविधांचा विकास यामुळे गडचिरोली हा राज्यातला पहिला नक्षलमुक्त जिल्हा ठरेल, असा विश्वास मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात व्यक्त केला आहे.

**शिवराजसिंह चौहान-अहिल्यानगर**

शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी शेतीचं उत्पादन वाढविण्यास केंद्र शासनानं सर्वोच्च प्राधान्य दिले असून यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे, असं प्रतिपादन केंद्रीय कृषी, शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी काल अहिल्यानगर जिल्हयामध्ये केलं. राहाता तालुक्यातल्या बाभळेश्वर कृषी विज्ञान केंद्रात शेतकरी परिसंवादात चौहान बोलत होते. शेतकऱ्यांच्या विकासासाठी मंत्रालयानं सुरू केलेल्या विविध योजनांचा आढावा चौहान यांनी घेतला तसंच कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन केलं. लखपती दीदी आणि यशवंत शेतकऱ्यांचा यावेळी चौहान यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**पोलिस वर्धापन दिन**

'महाराष्ट्र पोलीस वर्धापन दिन' काल राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या प्रमुख उपस्थितीत दिमाखात साजरा करण्यात आला. पोलीस दलाचं शौर्य अतुलनीय असून महाराष्ट्र पोलिस दल आदर्श पोलीस दल असल्याचे गौरवोद्गार राधाकृष्णन यांनी काढले. पोलीस दलातल्या वाढलेल्या आव्हानांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांना अधिक सतर्क राहण्याचा सल्ला राज्यपालांनी दिला.

**फुले-सातारा**

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आयोजित उत्सवासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सकाळी 11 वाजता सातारा जिल्ह्याच्या खंडाळा तालुक्यातील नायगाव इथं येणार आहेत. या कार्यक्रमानंतर ते पुण्यात आयोजित नो युवर आर्मी या मेळाव्याच्या उद्घाटन कार्यक्रमासाठी पुण्यात येणार आहेत.

**पिफ्फ-पुणे**

23वा पुणे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव यंदा 13 ते 20 फेब्रुवारी या कालावधीत पुण्यात होणार आहे. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक आणि पुणे फिल्म फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. जब्बार पटेल यांनी काल पुण्यात पत्रकार परिषेदत याबाबत घोषणा केली. या महोत्सवात मराठी चित्रपटांबरोबरच दीडशेहून अधिक देशी-परदेशी चित्रपट प्रेक्षकांना बघता येतील. दिवंगत ज्येष्ठ अभिनेते राज कपूर यांची जन्मशताब्दी ही या वर्षीच्या महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना आहे. जागतिक चित्रपट स्पर्धात्मक विभागात 107

देशातल्या 14 चित्रपटांची निवड अंतिम फेरीसाठी करण्यात आली असून सर्वोत्कृष्ट चित्रपटाला संत तुकाराम चित्रपट पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार आहे.

**अवयवदान-आरती गोखले**

पुण्यात गेल्या वर्षभरात मृत व्यक्तींच्या 70 अवयवदानाची नोंद झाली असल्याची माहिती, पुणे अवयव प्रत्यारोपण समितीच्या समन्वयक आरती गोखले यांनी दिली आहे. याबाबत आकाशवणीला अधिक माहिती देताना त्या म्हणाल्या.....

**अ. भा. वि. प. प्रदेश-अधिवेशन-लातूर**

अभाविपच्या कार्यकर्त्यानं राष्ट्र घडवण्याच्या कामात समर्पित असावं, ही अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची भूमिका असल्याचं प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केलं. अभाविपच्या देवगिरी प्रदेशच्या 59व्या प्रदेश अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते काल लातूर इथ बोलत होते.

**क्रीडा पुरस्कार**

केंद्रीय क्रीडा मंत्रालयातर्फे देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा काल करण्यात आली. ऑलिंपिकमधे दोन पदकं जिंकणारी नेमबाज मनु भाकर, विश्वविजेता बुद्धिबळपटू डी गुकेश, पॅरा ॲथलिट प्रवीणकुमार आणि हॉकीपटू हरमनप्रित सिंह यांना, यंदाचा मेजर ध्यानचंद खेल रत्न पुरस्कार जाहीर झाला आहे. महाराष्ट्राचा नेमबाज स्वप्नील कुसाळे याला अर्जुन पुरस्कार, तर नेमबाजी प्रशिक्षक दीपाली देशपांडे यांना द्रोणाचार्य पुरस्कार जाहीर झाला आहे.

क्रीडा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 32 खेळाडूंना अर्जुन पुरस्कार जाहीर झाले आहेत. यात पॅरा ॲथलिट सचिन खिलारी याचाही समावेश आहे. पॅरा जलतरणपटू मुरलीकांत पेटकर आणि ॲथलिट सुचा सिंह यांना जीवनगौरव अर्जुन पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या 17 जानेवारीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान केले जातील. पुरस्कार जाहीर झालेल्या खेळाडूंचं उपमुख्यमंत्री तसंच राज्य ऑलिंपिक संघटनेचे अध्यक्ष अजित पवार यांनी अभिनंदन केलं आहे.

**देशपांडे-द्रोणाचार्य**

कोल्हापूरच्या आंतरराष्ट्रीय नेमबाज प्रशिक्षक दिपाली देशपांडे यांनी पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीकडे आपल्या भावना व्यक्त केल्या...

**हवामान**

कोकण वगळता राज्यात किमान तापमान 15 अंशांच्या खाली आलं आहे. कमाल तापमान मात्र 30 अंशांच्या वर राहण्याचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.